स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मानव्य विद्याशाखेंतर्गत “मराठी” विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाची स्थूल रूपरेषा

“मराठी चित्रपट पटकथांत रूपातंरीत झालेल्या मराठी कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास”(निवडक कादंबऱ्यांच्या आधारे)

⁕ संशोधक ⁕

प्रा. बसवेश्वर वीरभद्र स्वामी

एम.ए.,एम.फिल.(मराठी)

मराठी विभाग,

शाहीर अण्णाभाऊ साठे कनिष्ठ महाविद्यालय, मुखेड ता. मुखेड जि.नांदेड

⁕ मार्गदर्शक ⁕

प्रा.डॉ.चंद्रकांत शेरखाने

एम.ए., पीएच.डी.

मराठी विभाग,

शिवाजी महाविद्यालय, रेणापूर, जि. लातूर.

⁕ संशोधन केंद्र ⁕

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

मार्च -२०२३

प्रास्ताविक :-

मराठी साहित्यामध्ये प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक कालखंडात मराठी साहित्याची निर्मिती झाली.त्याचबरोबर स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात ही मराठी साहित्याची निर्मिती झाली. तसेच १९४५ पर्यंतचे साहित्य व १९४५ नंतरचे साहित्य प्रवाह निर्माण झाले. तसेच १९६० नंतर मराठी ग्रामीण, दलित, स्त्रीवादी व आदिवासी साहित्याची निर्मिती झाली.व १९६०नंतरच्या साहित्यामध्ये वास्तवातून निर्माण झालेल्या.संघर्षरहित साहित्याची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली. मराठी साहित्यामध्ये कथा, कादंबरी, कविता, नाटक हे प्रवाह आले व सर्वात लोकप्रिय आणि सकल साहित्याचा प्रवाह ठरला तो म्हणजे मराठी कादंबरी या साहित्य प्रवाहातून साहित्य कथानक , घटना, प्रसंग वातावरण, पात्र यांचा अभ्यास अनेक मराठी लेखकांनी मानवाच्या वास्तववादी जीवन संघर्षातून मांडला आहे. आपले जीवन पुस्तकातून मानवाला वाचायला मिळू लागले. प्रत्यक्ष जीवनातील अनुभव, प्रसंग, घटना, साहित्यात पहावयास मिळाल्या व जीवनाचे विविधांगी घटना,प्रसंग साहित्यातून चित्रित होऊ लागले. इतर साहित्य प्रवाहापैकी कादंबरी हा प्रवाह महत्त्वाचा ठरला. कारण यात आलेली पात्रे बोलकी ठरू लागली. तीच कादंबरीतील विविध बोलकी पात्रे चित्रपटाच्या पटकथेतून प्रत्यक्ष बोलू लागली व मानवाच्या मनावर ही पात्रे अधिराज्य गाजवू लागलेली दिसून येतात. कादंबरी वाङ्मय प्रकारातून निर्माण झालेले मराठी चित्रपट व पटकथा लेखन त्यातील संवाद यांचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधातून घ्यावयाचा आहे. कादंबरीचे विविध प्रवाह व प्रकार अभ्यासल्यानंतर कादंबरीचा वाङ्मयाचा इतिहास त्याचे स्वरूप अभ्यासल्यानंतर कादंबरीवर आधारित मराठी चित्रपट यांचा अभ्यास करणे योग्य ठरते.

प्रस्तुत शोधनिबंधात कादंबरीची व्याख्या, स्वरूप, घटक, प्रकार सांगून कादंबरीवर आधारित निवडक चित्रपटांच्या पटकथांचा अभ्यास मांडता येतो.

मराठी चित्रपटाची सुरुवात मराठी कादंबरीवर कोणी व कोणत्या निवडक चित्रपटांची निर्मिती झाली हे सांगता येईल. भारतामध्ये सिनेमाचे आगमन झाले. १९१३ मध्ये दादासाहेब फाळके यांनी "राजा हरिश्चंद्र" हा पहिला मूकपट निर्माण केला आणि भारतीय सिनेमाचा आरंभ झाला. "राजा हरिश्चंद्र" याच कथेवरून निर्माण झालेला प्रभातचा "आयोध्येचा राजा" हा बोलपट १९२३ साली आला आणि इथूनच मराठी सिनेमाच्या वाटचालीस सुरुवात झाली. दादासाहेब फाळके यांना भारतीय चित्रपटाचे जनक असे म्हणतात. १९३२ते २०२०, २०२३पर्यंत अंदाजे २६०० मराठी चित्रपट निर्माण झाले. १९६० नंतर साहित्यावर आधारित मराठी चित्रपटांची निर्मिती होऊ लागली. कथा-कादंबरीवर काही चित्रपट आले. त्यामध्ये काही चित्रपट फसले तर काही चित्रपट कादंबरीवर जमले. साहित्यातील मांडलेल्या विचारांचा स्पर्श सिनेमासृष्टीला झाला व त्यातून दिग्गज असे नवनवीन मराठी साहित्यावर चित्रपट येऊ लागले. अण्णाभाऊ साठे (फकिरा, वारणेचा वाघ), शंकर पाटील (टारफुला), श्री.ना.पेंडसे (गारंबीचा बापू) ही काही ठळक नावे सांगता येतात. १९६०नंतरचे साहित्य व त्या साहित्यावर निर्माण झालेले निवडक चित्रपट यांचा अभ्यास शोधनिबंधात करण्याचा छोटासा प्रयत्न मी करणार आहे. तसेच मराठी कादंबरीवर आधारित असणाऱ्या मराठी चित्रपटांच्या पटकथेचा व मूळ कादंबरीचा अभ्यास या शोधनिबंधात मी करणार आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

साहित्यप्रकार आता मराठी वाचकांना अपरिचित राहिलेला नाही. साहित्य व साहित्यप्रकाराची भरपूर चिकित्सा झाली आहे. मात्र काही निवडक साहित्य सोडले तर बरेच अशी महत्त्वाचे साहित्य निर्मिती बाजूला आहे. त्यांची व्हावी तेवढी चिकित्सा झालेली नाही. काही महत्त्वपूर्ण लेखक, लेखिका व त्यांचे साहित्य निर्मिती आजही दुर्लक्षित झालेले आहे आणि त्यांची ओळख व्हावी व

त्यांनी निर्माण केलेल्या साहित्यावर आधारित मराठी चित्रपटांच्या पटकथेची ओळख व्हावी व साहित्यावर आधारित निर्माण झालेल्या मराठी चित्रपटांची पटकथा व त्या चित्रपटाच्या पटकथेची चिकित्सा या संशोधनातून वाचकांपर्यंत पोहोचवणे हे संशोधनाचे वेगळेपण आहे. तसेच लेखकाने लिहिलेल्या मराठी कादंबरीवर त्यावर आधारित चित्रपट पटकथा वाचकांच्या निदर्शनास आणणे हा या संशोधनाला वेगळे महत्त्व आहे व कादंबरी व कादंबरीवर आधारित पटकथा कशी वेगळी असते याचे महत्त्व या संशोधनातून दाखवणे क्रमप्राप्त ठरते. काही निवडक कादंबरीवर आधारित मराठी चित्रपट निर्माण झाले त्याची माहिती या संशोधनात घ्यावयाची आहे.

संशोधन विषयाच्या अभ्यासाचा हेतू :-

कोणत्याही कलाकृतीला विशिष्ट महत्त्व प्राप्त झालेले असते. कारण साहित्य कृतीमध्ये मांडलेले विविध प्रश्न, समस्या, घटना, विषय यामुळे साहित्यकृती सारख्या वाटू लागतात. परंतु लेखकाने त्यांच्याकडे वेगवेगळ्या दृष्टितून पाहून त्यातील इतर दृष्टिकोन वेगळ्या पद्धतीने मांडलेली असते. साहित्यात आलेले जीवन, अनुभव व त्यांचे विश्व, त्यांचे जगणे, त्यांचे विविधांगी प्रश्न साहित्यातून येऊ लागतात व तेच प्रसंग, घटना चित्रित होऊ लागल्या. कादंबरी साहित्यातून चित्रित झालेले भावविश्व जशासतसे चित्रपटातून पटकथेत आले आहे. तर त्यात काही बदल झाला का? घटना, प्रसंग, भाषा, संवाद, स्थळ यांची उकल करणे, त्यांची योग्य ती माहिती प्रातिनिधीक स्वरूपात चिकित्सा केली जाईल. मूळ कादंबरीमधील कथा, संवाद, घटना, स्थळ यांची काही मोडतोड झाली आहे का? ते या संशोधनातून सिद्ध होईल.

संशोधन विषयाचे वेगळेपण :-

मराठी साहित्य हे लोकांच्या रूढी, प्रथा, चालीरितीतून निर्माण झाले आहे. तसेच समाजाच्या वास्तवाचे व समाजातील विविध प्रश्नांचे विचारही साहित्यातून प्रगट झाले आहेत. कादंबरीत आलेले जीवन व संघर्ष पात्रांना योग्य न्याय देतांना दिसतात. म्हणून कादंबरीतील पात्रांच्या वाट्याला आलेले दु:ख व कादंबरीतील घटना, प्रसंग, भाषा, संवाद, स्थळ-काळ, पात्र जशास तसे पटकथेत आले का? व त्यात काही बदल झाला का? व वाचकांना व प्रेक्षकांना मिळणारा आनंद वाचनातून व तोच आनंद पाहण्यातून मिळतो का? हे पाहणे देखील संशोधन विषयाचे वेगळेपण ठरावे. कादंबरीपेक्षा चित्रपटाची पटकथा निश्चित वेगळी आहे म्हणून कादंबरीतील घटना, प्रसंग, पात्र, संवाद व चित्रपटातील पटकथेचा संवाद यात काय फरक आहे हे वेगळेपण देखील ठरावे.

संशोधन विषयाची मर्यादा :-

संशोधन म्हटले की, वेगवेगळे अंग असतात. कोणतेही संशोधन हे परिपूर्ण अंगाने नसते. एकच संशोधन विविध दृष्टिकोनातून होऊ शकते. साहित्यकृतीचे संशोधन वेगवेगळ्या व निवडक दृष्टिने संशोधक अभ्यास करत असतात. संशोधनाचे वेगवेगळे अंगे म्हटल्यानंतर संशोधनास मर्यादा पडत असतात. त्यासाठी माझ्या संशोधनात काही निवडक चित्रपटाला पटकथा देणाऱ्या निवडक कादंबरीचा विचार या अभ्यासात करण्यात आला आहे. भरपूर कादंबरीवर चित्रपट पटकथा आल्या परंतु काही मर्यादांमुळे निवडक कादंबरीवरील पटकथांचा अभ्यास करण्यात येत आहे. इतरही महत्त्वपूर्ण विषयावर कादंबऱ्या वरील चित्रपट पटकथा आहेत. परंतु एका विविध अंगाने निर्माण झालेले साहित्य मी अभ्यासासाठी घेणार नाही ही मर्यादा या विषयाची समजावी. विविध अंगाने साहित्यकृतीचा अभ्यास असल्यामुळे एकांगी अंगाच्या कलाकृतीची मर्यादा समजावी. विविध कादंबरीवरील चित्रपट पटकथेवरून वेगवेगळे विषय प्राप्त झाले आहेत. त्यामुळे येणाऱ्या भावना, दु:ख, वेदना, विचार, संस्कार,

बोलीभाषा तसेच विविध महत्त्वाचे प्रश्न विवेचनात येणार आहेत. त्यामुळे एका विषयाचा विचार केला की, दुसरा विषय बाजुला राहतो त्यामुळे संशोधनात काही तरी शिल्लक राहते. जे शिल्लक राहते ती या संशोधनाची मर्यादा समजावी.

संशोधन विषयाची सामग्री :-

"मराठी चित्रपटाला पटकथा देणाऱ्या निवडक कादंबरीचा अभ्यास" या विषयावरील संशोधनासाठी प्रकाशित झालेल्या एकूण दहा निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यांची नोंद परिशिष्टामध्ये केलेली आहे. संशोधन पूर्ण होण्यासाठी वेगवेगळे संदर्भग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे, प्रकाशित लेख, पटकथा, संगणकीय माहिती, शब्दकोश तसेच अप्रकाशित संशोधन प्रबंध, कादंबरी, कथा, व्याकरण पुस्तक, अभ्यासक, विचारवंत, स्थळ इत्यादींचा आधार संशोधन कार्य पूर्ण होण्यासाठी घेतला जाईल.

संशोधन पद्धती :-

शोधप्रबंधाच्या पूर्ततेसाठी निवडक कादंबरी निवडण्यात आलेल्या आहेत. कादंबरीतील प्रसंग, घटना, पात्र, विषय, कादंबरीतील पात्राचे जीवन व त्याच्या जगण्याच्या समस्या स्पष्ट करण्यासाठी या कादंबरीतील पात्र, घटना, प्रसंग, स्थळ, संवाद जशास तसे चित्रपटाच्या पटकथेत आलेत का हे पाहण्यासाठी निवडक ग्रांथिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल. तसेच काही रसिक, अभ्यास, वाचक यांच्या अभ्यासातून व लिखाणातून, संवादातून व अभ्यासकाकडून संशोधनाच्या संदर्भातील योग्य ती माहिती संग्रहित केली जाईल. लिखित साधनांची समीक्षणे, परिक्षणे यांचा देखील संशोधन पूर्ण करण्यासाठी वापर केला जाईल.

शोधप्रबंधातील प्रकरणांची रूपरेषा :-

प्रकरण पहिले : मराठी कादंबरी व स्वरूप

मराठी साहित्याचा उगम ११ व्या शतकापासून मानला जातो. गद्यात्मक व पद्यात्मक साहित्याची निर्मिती ११ व्या शतकापासून होऊ लागली. ११व्या शतकामध्ये महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय होते. यांचे साहित्य गद्य व पद्य स्वरूपात निर्माण झाले. आपणाला प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन असे काही साहित्याचे कालखंड सांगता येतात. तसेच स्वातंत्र्यपूर्व मराठी साहित्य व स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य असाही प्रवाह सांगता येतो व 1960 नंतर ग्रामीण, दलित, स्त्रीवादी व आदिवासी साहित्य निर्माण होऊ लागले. या सर्व साहित्यामध्ये गद्य व पद्य अशी रचना पहावयास मिळते. म्हणून गद्यात्मक साहित्यांचा अभ्यास करताना या साहित्यामध्ये चरित्रग्रंथ, बखर वाङ्मय, कथा, कादंबरी, प्रवास वर्णन, चरित्र, आत्मचरित्र, नाटक असे प्रकार सांगता येतात. या सर्व प्रकारात उशिराने का होईना पण कादंबरी हा वाङ्मय प्रकार लोकप्रिय ठरला. मराठी कादंबरी व तिचे स्वरूप थोडक्यात आपणाला या प्रकरणामध्ये अभ्यासावयाचे आहे. इतर साहित्य प्रकारापेक्षा कादंबरी साहित्य प्रकार कशाप्रकारे वेगळा आहे याची मीमांसा या प्रकरणात करण्यात येईल. इतर साहित्यापेक्षा कादंबरी साहित्य प्रकाराची लोकप्रियता दिवसागणिक वाढत चालली आहे. कादंबरी हा वाङ्मयप्रकार सर्वात लोकप्रिय असा आहे. पूर्वी पारंपरिक आख्याने, संतकाव्य, संतचरित्रे, बखर याचा परिचय समाजाला होता. त्याचबरोबर कीर्तन, प्रवचन, पोथी, आख्याने यांचाही परिचय समाजातील व्यक्तीला होता व ते फार आवडीने याचे श्रवण करत होते. इंग्रजांच्या आगमनानंतर शिक्षणाचे महत्त्व वाढले व शिक्षित वर्ग साहित्याकडे वळला. शिक्षित वर्गाकडून कादंबरी हा साहित्यप्रकार हाताळला जाऊ लागला. १९व्या शतकामध्ये युरोपमध्ये कादंबरीने आपले स्पष्ट, स्वतंत्र रूप धारण केले. भारतामध्ये इंग्रजी भाषांतराचे युग मराठी कादंबरीमध्ये अवतरले. सुरुवातीला भाषांतरीत कांदबरींचा अभ्यास झाला. नंतर “बनियनच्या प्रिल ग्रिम्स प्रोग्रेस”

या कादंबरीचे हरिभाऊंनी मराठी भाषांतर करून “यांत्रिकीक्रमण” ही कादंबरी इ.स. १८४१मध्ये लिहिली. ही कादंबरी भाषांतरीत होती. १८५७ मध्ये लिहिलेली कादंबरी बाबा पद्‌मनजी यांची “यमुना पर्यटन” ही कादंबरी मराठीतील पहिली कादंबरी होण्याचा मान या कादंबरीला मिळतो. नंतर कितीतरी कादंबरीने आपले विविध मूल्ये घेऊन प्रवाहात आल्या. अशा कादंबरींचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येतो. इतर साहित्य यांचे स्वरूप सांगून मराठी कादंबरीचे स्वरूप स्पष्ट करून या साहित्याच्या प्रेरणास्त्रोतांचा परामर्शही या प्रकरणात घेतला जाईल. कादंबरी साहित्यप्रकार कथा, कविता, नाटक यांच्यापेक्षा कसा भिन्न आहे यांची मीमांसा करून कादंबरीचे स्वरूप स्पष्ट केले जाईल. मराठी कादंबरीच्या व्याख्या, प्रकार, स्वरूप, घटक यांचा अभ्यास या प्रकरणात केला जाईल. मराठी कादंबरीचा धावता आढावा घेऊन कादंबरी साहित्यप्रकाराचे महत्त्व यात विषद केले जाईल.

<u>प्रकरण दुसरे : मराठी चित्रपटांची वाटचाल</u>

चित्रपट ही अनेक सूचक दृश्यांची संघटना आहे. चित्रपटातील प्रत्येक दृश्याला स्वत:चा असा विशिष्ट आकृतीबंध असतो. परस्पर संबंधावर अवलंबून असलेल्या दृश्यांच्या मालिकांची विभागणी आशयानुरूप क्षेपणखंडामध्ये (शॉर्टस्/तुकडे) केलेली असते. एका क्षेपणखंडाचे मापण हे दृश्यांच्या दृश्यकामार्फत घेतलेला अखंड भाग असतो. असे अनेक शॉर्टस्/तुकडे यापासून एक अखंड अशी निर्मिती केली जाते. विविध अंगी विषयांना एकरूप प्राप्त करून एकच विषय चित्रपटातून मांडला जातो. मांडणी समुहातील आत्मिक व भौतिक स्थित्यंतरांचा अधिक सुक्ष्म आणि संवेदनशिलतेने प्रकट करणारी चित्रपट ही आधुनिक कला आहे. व्यक्ती व समाज यांच्या संपूर्ण रचनेचा छेद या कलेच्या कलाकृतीमध्ये घेतलेला आढळतो. अनुभवांच्या व्यमिश्रतेला दृश्य आणि

श्राव्य आकृतीबंधाद्वारे मूर्त स्वरूप प्राप्त करून देणारी ही कला इतर कलांच्या तुलनेने समष्टीच्या पातळीवर अधिक पोहोचते.

भारतात सिनेमांचे आगमन झाले. मराठी माणसामुळे १९१३ साली दादासाहेब फाळके यांनी "राजा हरिश्चंद्र" हा पहिला मूकपट निर्माण केला आणि भारतीय सिनेमाचा आरंभ झाला. "राजा हरिश्चंद्र" यांच्या कथेवरून निर्माण झालेला प्रभातचा "आयोध्येचा राजा" हा बोलपट १९३२साली आला. एकूणच मराठी सिनेमाच्या वाटचालीस सुरुवात झाली. भारतीय चित्रपटाचे जनक दादासाहेब फाळके यांचा "हरिश्चंद्राची फॅक्टरी" हा चित्रपट आहे. इथून विविध अशा विषयानुरूप चित्रपटांची निर्मिती झाली. कालखंडानुसार, विषयानुसार, दशकानुसार, घटनानुसार एकापेक्षा एक नवनवीन मराठी चित्रपट आले आहेत. या नुसार कोणकोणते नवीन चित्रपट आले याची माहिती या प्रकरणात घेण्यात येईल. विषयानुसार चित्रपटांच्या माध्यमातून मानवी जीवनास कशी प्रेरणा मिळत गेली यांचाही शोध या अभ्यासात करण्यात येईल. दृश्यात्मक दृष्टिकोन, दाखवलेली गोष्ट, मानवास लवकर समजते. ती जास्त रूजते. यांची ओळख विविध चित्रपटांच्या माध्यमातून सांगितली जाईल. कालखंडानुसार चित्रपट निर्मितीत कसा बदल होत गेला. याचाही शोध या अभ्यासाने घेता येऊ शकतो.

<u>प्रकरण तिसरे : मराठी चित्रपट : पटकथा स्वरूप</u>

मराठी चित्रपटांचा आवाका व्यापक असतो. यातून मांडलेले विषयही व्यापक स्वरूपाचे असतात. चित्रपटांची निर्मिती ही पटकथेवर अवलंबून असते. पटकथा जेवढी जबरदस्त आहे तेवढे चित्रपट चांगले निर्माण होतात. काही दिग्दर्शक व कलाकार चित्रपटांची पटकथा पाहूनच चित्रपटांवर व चित्रपटात काम करायचे ठरवतात. या प्रकरणात पटकथा म्हणजे काय? पटकथा कशी लिहिली जाते व त्यांचे स्वरूप काय आहे? यांचा अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे. पटकथा ही घटनेवर, प्रसंगावर तसेच एखाद्याच्या म्हणण्यानुसार व लिखित

साहित्यावर लिहिली जाते. पटकथा लिहिताना ती कशा स्वरूपाने लिहिली जाते याचा अभ्यास या प्रकरणात करता येतो. मूळ कथावस्तु तशीच ठेऊन तिचे चित्रपटासाठी संवादात्मक तसेच रचनात्मक रूपांतर कसे केले जाते याचाही अभ्यास यामध्ये केला जातो. चित्रपटाची पटकथा कशी लिहिली जाते, तिचे विविध पैलू कोणते आहेत व ते कशा स्वरूपात लिहिले जातात याचाही विचार या पाठात होणे क्रमप्राप्त ठरते. पटकथा हा एक अनोखा साहित्यप्रकार आहे. पटकथा ही तांत्रिक शब्दजाल आणि घट्ट, सुट्टे गद्य वापरून लिहिली जाते. चित्रपटाच्या पटकथा ह्या कादंबरीवर किंवा लघुकथेवर असतात. कथेच्या शाब्दिक आणि दृश्य पैलुंचे वर्णन करण्यावर लक्ष्य केंद्रीत करते तसेच पटकथा लेखनात उप मजकूर, कृती आणि प्रतिकात्मकतेद्वारे विचार आणि भावना जागृत कसे करते याचा विचार या घटकात करण्यात येईल.

प्रकरण चौथे : मराठी चित्रपट पटकथांत रूपातंरीत झालेल्या मराठी कादंबऱ्यां

काही मराठी चित्रपटांची निर्मिती ही साहित्यावर, लेखनावर झालेली आहे. त्यामध्ये कथा चरित्र, आत्मचरित्र व कांदबरी अशा वाङ्मय साहित्य प्रकारावर चित्रपटांच्या पटकथांची निर्मिती झाली आहे. त्यामध्ये कांदबरी या वाङ्मय प्रकारावर मोठ्या प्रमाणात चित्रपटांची निर्मिती झाली. महत्त्वपूर्ण व निवडक अशा विविध कादंबरीवर आधारित मराठी चित्रपटांची पटकथा तयार करण्यात आली आहे. त्यापैकी काही निवडक मराठी कादंबऱ्यांवर आधारित असलेले निवडक चित्रपटाला पटकथा देणाऱ्या काही कादंबरीचा अभ्यास या घटकात करण्यात आला आहे. साहित्य व सिनेमा हे संवेदनशील व प्रभावी माध्यम आहे. साहित्यातून व चित्रपटातून समाजदर्शन होत असते. कादंबरीवर आधारित सिनेमे मोठ्या प्रमाणात प्रदर्शित झाले आहेत. चित्रपटांना रसिकांच्या लोकप्रियतेबरोबरच मानाचे सन्मान मिळाले आले.

मराठी चित्रपट पटकथांत रूपातंरीत झालेल्या मराठी कादंबऱ्यां

:-

१.	बनगरवाडी	-	व्यंकटेश माडगूळकर
२.	वैजेयंता	-	अण्णा भाऊ साठे
३.	भंडारभोग/चौंडक	-	राजण गवस
४.	नटरंग	-	आनंद यादव
५.	दुनियादारी	-	सुहास शिरवळकर
६.	शाळा	-	मिलिंद बोकिल
७.	वारणेचा वाघ	-	अण्णा भाऊ साठे
८.	निशाणी डावा अंगठा	-	रमेश इंगळे
९.	तुंबाडचे खोत	-	श्री.ना.पेंडसे
१०.	गारंबीचा बापू	-	श्री.ना.पेंडसे

या कादंबऱ्यांचा अभ्यास या प्रकरणातून करता येईल.

प्रकरण पाचवे : पटकथा आणि कादंबरी

साहित्यामध्ये व पटकथेमध्ये काय फरक व बदल असतो यांची माहिती या प्रकरणात घेण्यात येईल. पटकथा कशी लिहिली जाते, त्याचे स्वरूप व तंत्र

काय आहे. दृश्यानुसारपटकथा कशा लिहिल्या जातात व त्याची मांडणी कशी केली जाते यांचा थोडक्यात परिचय करून घेतला जाईल.

कादंबरीवर आधारित ज्या काही पटकथा आहेत त्या कादंबरीतील संवाद, स्थळ, घटना, प्रसंग, भाषा यांची तोडमोड पटकथा लिहिताना झाली का हेही या द्वारे सांगता येईल. पटकथा लेखन व कादंबरीलेखन यात मुख्य बदल काय असतो याचाही परिचय यामध्ये होईल.

मराठी चित्रपटाची पार्श्वभूमी पाहताना कथात्मक चित्रपटामध्ये पटकथा ही चित्रपटांचा सांगाडाच न राहता, पटकथेच्या रूपाशी चित्रपटाच्या शैलीची सांगड घट्ट विणलेली असते. कथा, कादंबरी, नाटक, काव्य वा एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण बीजावर बेतलेली लिखित पटकथा दृशकाच्या साहाय्याने चित्रित करून रूपेरी पडद्यावर त्याची दृश्यात्मक अनुभूती देते.

पटकथा व कादंबरी यांचा स्थूल तौलनिक अभ्यास यामध्ये करण्यात येईल.

<u>प्रकरण सहावे : निष्कर्ष-उपसंहार</u>

आशय, रूपबंध आणि शैली या अनुषंगाने कादंबरी व पटकथा वाङ्मय साहित्य हे वेगळ्या जाणिवांनी अभिव्यस्त झालेले आहे. कादंबरी व पटकथा यातील भिन्नता व कादंबरी व चित्रपटातून आलेले दु:ख-सुख, जाणीवांबरोबरच तेथील पात्राच्या आवडीनिवडी, जगण्याच्या पद्धती, रिती आणि संवादशैली यात चित्रित केलेल्या असतात. या मागे काही बदल व प्रेरणा असतात याचा संदर्भ लक्षात घेता, पहिल्या प्रकरणापासून ते पाचव्या प्रकरणापर्यंत संशोधन विषयाच्या घटकांचा सविस्तर अभ्यास करणे यात महत्त्वाचे ठरते.

कादंबरी व चित्रपट, पटकथा यातून चित्रित झालेले घटना, प्रसंग, भाषाशैली, संवाद यांची वास्तविक जीवनातील संघर्ष, निष्कर्ष नोंदवले जाईल.

प्रकरणाच्या शेवटी चित्रपट कथा व कादंबरी यांच्या मूल्यमापनाचे काही निष्कर्ष सांगून या कादंबऱ्यांचे केलेले वाङ्मयीन मूल्यमापन सारांशरूपाने नोंदवले जाईल. प्रकरणाच्या शेवटी काही प्रातिनिधिक निष्कर्षांची नोंदही केली जाईल.

परिशिष्ट्ये :

परिशिष्ट १ : मूळ आधारभूत ग्रंथसूची

परिशिष्ट १ : संदर्भसूची

प्रातिनिधिक मुलाखती

परिशिष्ट १ :- मूळ आधारभूत ग्रंथसूची

१.	बनगरवाडी	-	व्यंकटेश माडगूळकर
२.	वैजयंता	-	अण्णा भाऊ साठे
३.	भंडारभोग/चौंडक	-	राजण गवस
४.	नटरंग	-	आनंद यादव
५.	दुनियादारी	-	सुहास शिरवळकर
६.	शाळा	-	मिलिंद बोकिल
७.	वारणेचा वाघ	-	अण्णा भाऊ साठे
८.	निशाणी डावा अंगठा	-	रमेश इंगळे

९.	तुंबाडचे खोत	-	श्री.ना.पेंडसे

१०.	गारंबीचा बापू	-	श्री.ना.पेंडसे

टीप :-सदरील संशोधन आराखड्यात संशोधनाला गती येईल त्याप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी बदल होणे संभवनीय आहे.

*** संशोधक ***
प्रा. बसवेश्वर वीरभद्र स्वामी
एम.ए.एम.फिल.(मराठी)
मराठी विभाग,
शाहीर अण्णाभाऊ साठे कनिष्ठ महाविद्यालय, मुखेड ता. मुखेड जि.नांदेड

*** मार्गदर्शक ***
प्रा.डॉ.चंद्रकांत शेरखाने
एम.ए., पीएच.डी.
मराठी विभाग,
शिवाजी महाविद्यालय, रेणापूर, जि. लातूर.